पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८.
मा.स्थायी समिती
कार्यपत्रिका क्रमांक - ९
**सभावृत्तांत**

दिनांक - ०५/०६/२०१२ वेळ - दुपारी ३.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहीक सभा मंगळवार, दिनांक ५/६/२०१२ रोजी दुपारी ३.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा. अविनाश (दादा) टेकावडे
२) मा. चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके
३) मा. विनया प्रदिप (आबा) तापकीर
४) मा. छाया जगन्नाथ साबळे
५) मा. जम सोनाली पोपट
६) मा. पाडाळे निता विलास
७) मा. जगताप नवनाथ दत्तु
८) मा. भोसले राहुल हनुमंतराव
९) मा. चोंधे आरती सुरेश
१०) मा. भालेकर अरुणा दिलीप
११) मा. अश्विनी गजानन चिंचवडे - पाटील
१२) मा. सोनकांबळे चंद्रकांता लक्ष्मण

याशिवाय मा.कारचे, मा.दुरगुडे, मा.बंब, - सहा.आयुक्त, मा. चाकणकर - प्र.नगरसचिव, डॉ. जगदाळे - प्र.आरोग्य वैद्यकिय अधिकारी, मा.भदाणे - उपसंचालक (नगररचना), मा.ढगे, मा.निकम, मा. रामदास जाधव, मा.कुदळे - कार्यकारी अभियंता, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

( सभा भरवणेसाठी नेमलेल्या वेळी मा. सभापती सभागृहात उपस्थित नव्हते.)

खालीलप्रमाणे सूचना मांडणेत आली.

सुचक :- मा. चंद्रकांता सोनकांबळे अनुमोदक :- मा. राहूल भोसले

सभा भरवणेसाठी नेमलेल्या वेळी मा. सभापती सभागृहात उपस्थित नसल्याने मा. चंद्रकात वाळके याची सभेच्या अध्यक्षस्थानी निवड करणेत यावी.

सदर सूचना सर्वानुमते मान्य झाली.

( मा. चंद्रकांत वाळके यांनी सभेचे अध्यक्षस्थान स्विकारले )

----------

खालील प्रमाणे सुचना मांडणेत आली

सुचक :- मा. चंद्रकांता सोनकांबळे अनुमोदक :- मा. अविनाश टेकावडे

मुंबई पुणे द्रुतगती मार्गावरील अपघातात मृत पावलेल्या व्यक्तींस तसेच काश्मीर येथील दुर्घटनेत मृत पावलेल्या कोराड कुटूंबीयांस श्रध्दांजली वाहून मंगळवार दिनांक - १२/०६/२०१२ रोजी दुपारी २.४५ पर्यंत सभा तहकूब करणेत यावी.

सदर सूचना सर्वानुमते मान्य झाली.

----------

( उपस्थितांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली )

मा.सभाध्यक्ष - मंगळवार दिनांक - १२/०६/२०१२ रोजी दुपारी २.४५ पर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे.

**( चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके )**
**सभाध्यक्ष**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८.
मा.स्थायी समिती
कार्यपत्रिका क्रमांक - ९
सभावृत्तांत
( दिनांक - ०५/०६/२०१२ ची तहकूब सभा )

दिनांक - १२/०६/२०१२ वेळ - दुपारी २.४५वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची दिनांक ०५/०६/२०१२ ची तहकूब सभा मंगळवार, दिनांक १२/०६/२०१२ रोजी दुपारी २.४५ वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा. जगदीश शेट्टी - सभापती
२) मा. अविनाश (दादा) टेकावडे
३) मा. चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके
४) मा. जम सोनाली पोपट
५) मा. सौ. तनपुरे सुषमा राजेंद्र
६) मा. पाडाळे निता विलास
७) मा. जावेद रमजान शेख
८) मा. जगताप नवनाथ दत्तु
९) मा. भोसले राहुल हनुमंतराव
१०) मा. चोंधे आरती सुरेश
११) मा. भालेकर अरुणा दिलीप
१२) मा. अश्विनी गजानन चिंचवडे - पाटील

याशिवाय मा.प्रकाश कदम - अति.आयुक्त, मा.सावंत - सह आयुक्त, मा.झुरे, मा.कारचे, मा.ढेरे, मा.गायकवाड, मा.पवार, मा.बंब, मा.दुरगुडे - सहा.आयुक्त, मा.घाडगे -मुख्यलेखापरिक्षक, मा.चाकणकर - प्र.नगरसचिव, मा.कांबळे - प्र.शहर अभियंता, मा.चव्हाण -सह शहर अभियंता, मा.चिंचवडे, मा.ढगे, मा.जाधव, मा.जाधव, मा.कुदळे, मा.कपिले, मा.खाबडे - कार्यकारी अभियंता, मा.जाधव - शिक्षणाधिकारी (माध्य.), मा.पवार - प्र.कायदा सल्लागार, मा.चोरघे - भांडार अधिकारी, मा.गायकवाड - लेखाधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

दिनांक २९/५/२०१२ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक ८) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा. सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक - ५७६ विषय क्रमांक - १
दिनांक - १२/०६/२०१२ विभाग - उद्यान
सुचक :- मा.नवनाथ जगताप अनुमोदक :- मा.राहुल भोसले
संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे क्र.उद्यान/१/कावि/३८/२०१२, दि.०३/०३/२०१२

मा. महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या उद्यान विभागाकडील नि.नो.क्र.५/२०११/१२ मधील अ.क्र.१ अन्वये, भोसरी उड्डान पुलाखाली उद्यान विकसित करणेकामी मे.क्रिएटीव्ह बिझनेस असोसिएट्स (नि.र.रू. १६,२४,५००/-

[र.रू.सोळा लाख चोविस हजार पाचशे] पेक्षा १३.५० % कमी) या ठेकेदाराकडून करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ५७७ विषय क्रमांक - २
दिनांक - १२/०६/२०१२ विभाग - स्थापत्य
सुचक :- मा. अविनाश टेकावडे अनुमोदक :- मा.चंद्रकांत वाळके
संदर्भ :- मा. शहर अभियंता यांचे क्र.स्था/नि/४ड/कावि/१०९/२०१२, दि.१६/०४/२०१२

मा. शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.G४B/२५/२०११-१२ मधील अ.क्र.४२ अन्वये, प्रभाग क्र.९० पिंपळेनिलख येथील मनपा सार्वजनिक संडास ब्लॉकची स्थापत्य विषयक दुरुस्ती करणेकामी मे.साईप्रभा कन्स्ट्रक्शन (नि.र.रू.१८,६७,४०५/- [र.रू.अठरा लाख सदुसष्ट हजार चारशे पाच] पेक्षा २७.९९ % कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रू. १४,११,९५४/- पर्यंत काम करून घेणेस तसेच निविदा अटी प्रमाणे डांबर, सिमेंट, लोखंड या तिन्ही मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ५७८ विषय क्रमांक - ३
दिनांक - १२/०६/२०१२ विभाग - प्रशासन
सुचक :- मा. आरती चौंधे अनुमोदक :- मा.सोनाली जम
संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.प्रशा/१/कावि/२६९/२०१२, दि.०७/०४/२०१२
२) मा.विधी समिती सभा दिनांक ०७/०५/२०१२ ठराव क्र.७

मा. महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेऊन -

नवीन दोन जादा प्रभाग निर्माण करावयाचे असल्याने त्यासाठी प्रस्तावासोबत सादर केलेल्या परिशिष्ठाप्रमाणे आवश्यक अशी पदे निर्माण करण्यास तसेच नगरसचिव कार्यालयातील लघुलेखकाच्या कामाचा वाढता व्याप लक्षात घेता, नगरसचिव कार्यालयासाठी "लघुलेखक उच्चस्तर"अभिनामाची नवीन दोन पदे सुधारित वेतनश्रेणी ६ व्या वेतन आयोगाप्रमाणे र.रु. ९३००-३४८०० ग्रेड वेतन ५४००/- या वेतनश्रेणीत पदोन्नतीने खाली दिलेल्या अर्हता व अटी - शर्ती मध्ये निर्माण करणेस, **अर्हता व अटी शर्ती -** १) लघुलेखन १२० श.प्र.मी. उत्तीर्ण असणे आवश्यक, २) मराठी टंकलेखन ४० श.प्र.मी. व इंग्रजी टंकलेखन ४० श.प्र.मी. उत्तीर्ण असणे आवश्यक, ३) किमान एच.एस.स(१२ वी) परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक, ४) MS-CIT परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक, ५) नगरसचिव कार्यालयात लघुलेखक पदावर कामकाजाचा किमान ५ वर्षाचा प्रत्यक्ष अनुभव असणे आवश्यक आहे. तसेच मा. महापालिका सभा ठराव क्र. १२८, दि. ०६/१०/२००७ अन्वये ४ कार्यकारी अभियंता (स्थापत्य) या पदांची मंजुरी करुन महाराष्ट्र शासनाकडे मंजुरीकामी पाठविणेत आलेली आहे. तसेच मा. विधी समिती ठराव क्र.७, दिनांक ०७/०५/२०१२ अन्वये दोन जादा प्रभाग निर्माण करावयाचे असल्याने त्यासाठी कार्यकारी अभियांता (स्थापत्य) यांची ६ (सहा) पदांच्या निर्मितीचा प्रस्ताव मा. स्थायी समिती समोर सादर करणेत आलेला आहे. परंतु महानगरपालिकेचा विस्तार पहाता आणखी १४ (चौदा) कार्यकारी अभियंता (स्थापत्य) यांची पदे अत्यावश्यक आहेत. म्हणजेच एकूण १४ (चौदा) कार्यकारी अभियंता (चौदा) पदांची निर्मिती होणे व मंजुरीकामी महाराष्ट्र शासनाकडे मंजूरीकामी पाठविणेस, तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. महापालिका सभा ठराव क्र. १६९७ दि.२७/११/१९९० अन्वये शहरांतर्गत दळणवळण व वाहतुकीचे नियोजन

करणेसाठी वाहतूक घटक (Traffic Cell) घटक स्थापन करणे व त्याकरीता असिस्टन्ट ट्रान्सपोर्ट प्लानर तथा उप परिवहन नियोजक या पदाची निर्मिती करुन त्यास महाराष्ट्र शासनाची शासन निर्णय क्र.पी.सी.सी.३०९१/४०२/ प्र.क्र.८९/९१/नवि - २२ दिनांक २१ डिसेंबर १९९१ अन्वये मान्यता घेतलेली आहे. १९९१ ते मे २०१२ पर्यंत या पदावर महानगरपालिकेने कोणाचीही रितसर नियुक्ती केलेली नाही किंवा कोणी अधिकारी या पदावर काम करणेस उत्सुक नसावा कारण की या पदावरील अधिका-यास इतरांप्रमाणे पदोन्नतीची संधीच उपलब्ध नाही. मुंबई, पुणे महानगरपालिका, सिडको, मुंबई महानगर प्रादेशिक विकास महामंडळ (MMRDA) इत्यादी ठिकाणी असलेल्या पदोन्नतीच्या संधीप्रमाणे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये असिस्टंन्ट ट्रान्सपोर्ट प्लानर या पदावरील अधिका-यास पुढील पदोन्नतीच्या संधी सोबतचे प्रपत्र अ मध्ये नमुद केल्याप्रमाणे देणे अत्यंत आवश्यक आहे. म्हणून ट्रान्सपोर्ट प्लानर तथा परिवहन नियोजक व सिनियर ट्रान्सपोर्ट प्लानर तथा वरिष्ठ परिवहन नियोजक या दोन पदांची नविन निर्मिती करण्यास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ५७९ | विषय क्रमांक - ४
दिनांक - १२/०६/२०१२ | विभाग - क्रिडा
सुचक :- मा. जावेद शेख | अनुमोदक :- मा. अविनाश टेकावडे

संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.क्रिडा/७/कावि/७२९/२०१२, दि.२२/१२/२०११
२) मा. क्रिडा समिती सभा दिनांक १६/५/२०१२ ठराव क्र.७

पुना डिस्ट्रीक्ट इंटर ऑफिसेस स्पोर्ट्स असोसिएशन यांना आंतरकचेरी कबड्डी, कॅरम (पुरुष),कॅरम (महिला),हॉकी,बुध्दीबळ,लॉन टेनिस,फुटबॉल जलतरण या ८ खेळांच्या स्पर्धा आयोजित करणेकामी आर्थिक पुरस्कार देण्यासाठी पुना डिस्ट्रीक्ट इंटर ऑफिसेस स्पोर्ट्स असोसिएशन यांना एकूण आर्थिक सहाय्य र.रु.१,३२,६००/- (अक्षरी र.रु.एक लाख बत्तीस हजार सहाशे) अदा करणेस व सदरचा खर्च क्रीडा निधीमधील वार्षिक क्रीडा स्पर्धा या लेखाशिर्षावर खर्ची टाकणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ५८० | विषय क्रमांक - ५
दिनांक - १२/०६/२०१२
सुचक :- मा. सोनाली जम | अनुमोदक :- मा.सुषमा तनपुरे

संदर्भ :- १) मा. जयश्री गावडे, मा. वैशाली काळभोर यांचा प्रस्ताव -
२) मा. क्रिडा समिती सभा दिनांक १६/५/२०१२ ठराव क्र.८

विषय :- परदेशी जाणा-या खेळाडूंना आर्थिक मदत देणेबाबत....
विषय क्रमांक ५ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ५८१ विषय क्रमांक - ६
दिनांक - १२/०६/२०१२ विभाग - पाणीपुरवठा
सुचक :- मा. राहूल भोसले अनुमोदक :- मा. नवनाथ जगताप
संदर्भ :- मा.सह शहर अभियंता यांचे क्र.पापु/६/कावि/६७१/२०१२, दिनांक - २५/०५/२०१२

मा.सह शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या पाणीपुरवठा विभागाकडील नि.नो.क्र.५/५२/२०११/१२ मधील अ.क्र.३१ अन्वये, ड प्रभागात ठिकठिकाणी पाण्याच्या उंच टाक्यांची इनलेट व आऊटलेटचे जुने, गळके व निकामी व्हॉल्व्ह बदलणे व नविन बटरफ्लाय व्हॉल्व्ह बसविणे व देखभाल दुरुस्ती करणेकामी मे.बालाजी इंजिनिअर्स (नि.र.रू. १८,७५,०२८/- [र.रू.अठरा लाख पंच्याहत्तर हजार अठ्ठावीस] पेक्षा १०.४० % कमी) या ठेकेदाराबरोबर करारनामा करून घेणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ५८२ विषय क्रमांक - ७
दिनांक - १२/०६/२०१२ विभाग - पाणीपुरवठा
सुचक :- मा. अश्विनी चिंचवडे अनुमोदक :- मा. निता पाडाळे
संदर्भ :- मा.सह शहर अभियंता यांचे क्र.पापु/६/कावि/६७२/२०१२, दिनांक - २५/०५/२०१२

मा.सह शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या पाणीपुरवठा विभागाकडील नि.नो.क्र.५/५२/२०११/१२ मधील अ.क्र.५२ अन्वये, अशुध्द जलउपसा जलवाहिनीचे रंगकाम व दुरुस्ती करणेकामी मे.बालाजी इंजिनिअर्स (नि.र.रू. १५,४०,१६०/- [र.रू.पंधरा लाख चाळीस हजार एकशे साठ] पेक्षा १६.७० % कमी) या ठेकेदाराबरोबर करारनामा करून घेणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ५८३ विषय क्रमांक - ८
दिनांक - १२/०६/२०१२ विभाग - पाणीपुरवठा
सुचक :- मा. आरती चौंधे अनुमोदक :- मा. अरुणा भालेकर
संदर्भ :- मा.सह शहर अभियंता यांचे क्र.पापु/६/कावि/६७३/२०१२, दिनांक - २५/०५/२०१२

मा.सह शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या पाणीपुरवठा विभागाकडील नि.नो.क्र.१०/१९/२०११/१२ मधील अ.क्र.६ अन्वये, जलक्षेत्र क्र.ड/१४ सांगवी परिसरात पाणीपुरवठा विषयक किरकोळ दुरुस्तीची कामे करणेकामी मे.बालाजी इंजिनिअर्स (नि.र.रू.१०,१९,२६६/- [र.रू.दहा लाख एकोणीस हजार दोनशे सहासष्ट] पेक्षा २३.०० % कमी) या ठेकेदाराबरोबर करारनामा करून घेणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ५८४ विषय क्रमांक - ९
दिनांक - १२/०६/२०१२ विभाग - मु.ले.प.
सुचक :- मा. चंद्रकांत वाळके अनुमोदक :- मा. जावेद शेख
संदर्भ :- मा. मुख्य लेखापरिक्षक यांचे क्र.मुलेप/१/६०९/२०१२, दिनांक - २४/०५/२०१२

मा. मुख्य लेखापरिक्षक यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मुख्यलेखापरिक्षण विभागामध्ये कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांनी रजा मंजुरीकामी सादर केलेल्या विनंती अर्जानुसार प्रस्तावा सोबतचे प्रपत्र घअड मध्ये दर्शविलेप्रमाणे रजा मंजूरीस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**(जगदीश शेट्टी )**
**सभापती**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी- ४११ ०१८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक - नस/४/कावि/ ८९० /२०१२
दिनांक - १४/०६/२०१२ चे लगत

प्र. नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

प्रत- सर्व संबंधीत शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

\\१७२.१६.०.६७\e\e drive\Nagersachiv१\Standing १२-१७\Proceeding ९.doc

**प्रपत्र - अ**

मा.स्थायी समिती सभा ठराव क्रमांक ५७८ दिनांक १२/०६/२०१२ चे लगत

| अ.क्र. | पदनाम | वेतनश्रेणी | शैक्षणिक अर्हता व अनुभव | पद भरणेची पध्दत | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | असिस्टंट ट्रान्सपोर्ट प्लानर तथा उप परिवहन नियोजक | पे स्केल १५६०० - ३९१०० ग्रेड पे ५४०० | १. स्थापत्य अभियांत्रिकी शाखेची पदवी बी.ई. (सिव्हिल) आणि परिवहन अभियांत्रिकीची पदव्युत्तर पदवी किंवा तत्सम<br>२. वाहतूक आणि दळण वळण शाखेकडील कामाचा अनुभव आवश्यक | सरळसेवा | पद मंजूर आहे. |
| २ | ट्रान्सपोर्ट प्लानर तथा परिवहन नियोजक | पे स्केल १५६०० - ३९१०० ग्रेड पे ६६०० | १. स्थापत्य अभियांत्रिकी शाखेची पदवी बी.ई. (सिव्हिल) आणि परिवहन अभियांत्रिकीची पदव्युत्तर पदवी किंवा तत्सम<br>२. वाहतूक आणि दळण वळण शाखेकडील ३ वर्षे कामाचा अनुभव आवश्यक<br>३. यापैकी किमान २ वर्षे उप परिवहन नियोजक पदाचा अनुभव | पदोन्नतीने | नविन पद |
| ३ | सिनियर ट्रान्सपोर्ट प्लानर तथा वरिष्ठ परिवहन नियोजक | पे स्केल १५६०० - ३९१०० ग्रेड पे ७६०० | १. स्थापत्य अभियांत्रिकी शाखेची पदवी बी.ई. (सिव्हिल) आणि परिवहन अभियांत्रिकीची पदव्युत्तर पदवी किंवा तत्सम<br>२. वाहतूक आणि दळण वळण शाखेकडील ५ वर्षे कामाचा अनुभव आवश्यक<br>३. यापैकी किमान ३ वर्षे परिवहन नियोजक पदाचा अनुभव | पदोन्नतीने | नविन पद |

**सभापती**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८